कामगार आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई.
(रचना व कार्यपध्दती शाखा)
कार्यासन - ०४
27 APR 2011
आवक क्रमांक........................
कार्यासन क्रमांक..................

RNI No. MAHBIL/2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ४४] शुक्रवार, मार्च ११, २०११/फाल्गुन २०, शके १९३२ [ पृष्ठे २, किंमत : रुपये २०.००

**असाधारण क्रमांक १६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३.**—बोनस प्रदान अधिनियम, १९६५, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम .. .. | १-२ |

दिनांक २७ फेब्रुवारी २०११ रोजी मा. राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३.

(मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर “ **महाराष्ट्र शासन राजपत्रात** ” दिनांक ११ मार्च २०११ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**बोनस प्रदान अधिनियम, १९६५, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९६५ चा २१. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, बोनस प्रदान अधिनियम, १९६५,महाराष्ट्र राज्यास लागू असतांना, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, त्यांनी दिनांक १७ सप्टेंबर २०१० रोजी बोनस प्रदान (महाराष्ट्र सुधारणा) अध्यादेश, २०१० प्रख्यापित केला होता ; (२०१० चा महा. अध्या. १२.)

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, बोनस प्रदान (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०१० असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १७ सप्टेंबर २०१० रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६५ चा अधिनियम क्रमांक २१ यामध्ये कलम ११क समाविष्ट करणे.

**२.** बोनस प्रदान अधिनियम, १९६५, महाराष्ट्र राज्यास लागू असताना (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) त्याच्या कलम ११ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९६५ चा २१.

बोनस प्रदान करण्याची पद्धत.

"**११क.** या अधिनियमाअन्वये बोनस म्हणून एखाद्या कामगाराला देय असणाऱ्या सर्व रकमा, कामगाराच्या नावे त्याच्या खात्यात रक्कम देय असलेला धनादेश काढून त्याद्वारे किंवा कामगाराच्या बँक खात्यामध्ये त्या जमा करून, देण्यात येतील.".

सन १९६५ चा अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम १९ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १९ मधील "रोखीने" हा मजकूर वगळण्यात येईल.

सन २०१० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ याचे निरसन व व्यावृत्ती.

**४.** (१) बोनस प्रदान (महाराष्ट्र सुधारणा) अध्यादेश, २०१०, हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २०१० चा महा. अध्या. १२.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदीन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तत्सम तरतुदीन्वये करण्यात आलेली कृती किंवा कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.